**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक : 17.06.2024** **वार सोमवार**

---

1.नागरिकांना जलद न्याय देण्यासाठी देशात १ जुलैपासून ३ नवे फौजदारी कायदे लागू करण्यात येणार

2.पुणे अपघात प्रकरणी बाल न्याय मंडळाच्या निर्णयात चुका असल्याचा चौकशी समितीचा अहवाल

3.राज्यात उद्यापासून "एसटी पास थेट तुमच्या शाळेत"

4.मिफ चित्रपट महोत्सवात 'माहितीपट बझार' सह भरगच्च कार्यक्रम

आणि

5.बावीस जूननंतर मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता

नवीन कायदे

नागरिकांना जलद, वेळेवर आणि त्रुटिमुक्त न्याय देण्यासाठी देशात येत्या १ जुलैपासून ३ नवे फौजदारी कायदे लागू करण्यात येणार आहेत. देशातील परिस्थिति आणि बदलणाऱ्या कालानुरूप, कायद्यांमध्ये ही सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचं मत केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन मेघवाल यांनी काल कोलकाता इथं व्यक्त केलं. 'फौजदारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनातील भारताचा प्रगतिशील मार्ग' या विषयावर आयोजित परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते काल बोलत होते. भारतातील सद्यस्थितीतील अनेक कायदे ब्रिटिशकालीन असून ते बदलण्याची मागणी अनेक स्तरातून केली जात होती. त्यानुसार आता भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि भारतीय साक्ष अधिनियम २०२३ हे तीन नवे कायदे येत्या १ जुलैपासून लागू होतील असं मेघवाल यांनी सांगितलं. हे कायदे केंद्र सरकार कोणत्याही सल्ल्याशिवाय घाईघाईने लागू करत आहे हा आरोप मेघवाल यांनी यावेळी फेटाळून लावला. गेल्या चार वर्षांमध्ये सर्व राज्यं, केंद्रशासित प्रदेश, कायदेपालक संस्था आणि कायद्याशी संबंधित सर्व व्यक्ती तसंच नागरिकांचा सल्ला घेण्यात आल्याची माहितीही मेघवाल यांनी दिली.

अहवाल

पुण्यातील कल्याणी नगरमधील अपघाताला कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन मुलाला जामीन मंजूर करताना, बाल न्याय मंडळानं अनेक चुका केल्या असल्याचा ठपका पाच सदस्यांच्या समितीनं ठेवला आहे. मंडळाच्या निर्णयाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या या समितीनं तयार केलेल्या १०० पानी अहवालात बाल न्याय मंडळाद्वारे अनेक चुका झाल्याचं नमूद करण्यात आलं आहे.

मोहोळ

केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यामधील वैकुंठ मेहता सहकार व्यवस्थापन संस्थेला भेट दिली आणि 1967 पासून सहकार क्षेत्रात कार्यरत या संस्थेची भूमिका समजून घेण्याच्या दृष्टिकोनातून प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. मोहोळ यांनी संस्थेमध्ये चालवल्या जाणाऱ्या सर्व केंद्रांचा आणि प्रशिक्षण कार्यक्रमांचा आढावा घेतला आणि संस्थेनं केलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केलं. संस्थेच्या संचालिका डॉक्टर हेमा यादव यांनी, संस्थेनं हाती घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती देताना संस्थेतील सात केंद्रांचं कामकाज तसंच सहकार मंत्रालयाच्या स्थापनेनंतर संस्थेनं राबवलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती दिली.

मोफत शिक्षण

आठ लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींना मोफत शिक्षण देण्याची राज्य शासनाची योजना असून, याबाबतचा शासन आदेश लवकरच जारी करण्यात येईल, असा विश्वास उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल पुण्यात व्यक्त केला. पुण्यातील श्री शुक्ल

यजु: शाखीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण सभेच्या वतीनं उभारण्यात येणाऱ्या सांस्कृतिक भवनाचं भूमीपूजन करताना पाटील बोलत होते. पुणे शहरात अनेक संस्था, संघटना वर्षानुवर्षे समाजसेवेचं काम अतिशय उत्तम पद्धतीनं करत आहेत अशा सर्व संस्थांचा विकास झाला पाहिजे अशी भावना पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

एसटी पास

राज्यात उद्यापासून एसटी प्रशासनातर्फे " एसटी पास थेट तुमच्या शाळेत " ही विशेष मोहीम राबविण्यात येत असून, शाळा- महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींना आता एसटीचे पास थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येणार आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनानं विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून 66 टक्के सवलत दिली आहे. शिवाय पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचं वितरण केलं जातं.

वॉका

मिफ इंट्रो-

१८व्या 'मिफ' अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा कालचा दुसरा दिवस भरगच्च कार्यक्रम आणि उपक्रमांसह पार पडला. आमच्या प्रतिनिधीचा हा वृत्तांत....

**स्क्रीप्ट**

**माहितीपट क्षेत्रातल्या नवोदितांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने यावर्षी पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या 'माहितीपट बझार'चं उद्घाटन 'दिल्ली क्राइम' या गाजलेल्या वेबसीरिजच्या निर्मात्या अपूर्वा बक्षी यांच्या हस्ते, महोत्सवाचे संचालक पृथुल कुमार आणि पत्रसूचना कार्यालयाच्या अतिरिक्त महासंचालक स्मिता वत्स शर्मा यांच्या उपस्थितीत झालं. विविध देशांचे, भाषांचे आणि विषयांवरचे माहितीपट, लघुपट आणि ॲनिमेशनपट दाखवण्यात आले. 'माय मर्क्युरी' या माहितीपटाचं आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आज 'मिफ'मध्ये झालं. गॅनेट नावाचे समुद्रपक्षी, पेंग्विन आणि नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या इतर पक्ष्यांच्या संरक्षण-संवर्धनासाठी आरामदायी आयुष्य सोडून एका अतिदुर्गम बेटावर जाऊन राहिलेल्या ईव्ह या इसमाची ही कहाणी आहे. चित्रपटांशिवाय, माहितीपटांचं अर्थकारण, आशयनिर्मिती, ॲनिमेशन अशा विविध विषयांवरची माहिती आणि मार्गदर्शनपर चर्चासत्रंही झाली. 'पोचर' या वेबसीरिजचे दिग्दर्शक रिची मेहता यांनी 'पोचरच्या अनुषंगाने गुन्हेगारी थरारपटाचे निर्मितीबंध' या विषयावर प्रेक्षकांशी संवाद साधला.आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, अंकिता आपटे, मुंबई.**

शास्त्रज्ञ

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील जैव-तंत्रज्ञान विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉक्टर महेंद्र रॉय यांना भारतातील अग्रणी दहा शास्त्रज्ञांमध्ये स्थान मिळालं आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठाने केलेल्या एका सर्वेक्षणानुसार डॉक्टर रॉय यांना जगातील सर्वोच्च दोन टक्के शास्त्रज्ञांच्या यादीतही स्थान मिळाल आहे.

अर्ज

कापूस, सोयाबीन आणि इतर तेलबिया आधारित पीक पद्धतीला चालना देवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी आणि या पिकांच्या मूल्यसाखळीस चालना देण्याकरिता राज्य शासनाच्या वतीनं तीन वर्षासाठी विशेष कृती योजना राबविण्यात येत आहे. या राज्य-पुरस्कृत विशेष कृती योजनेचा लाभ घेण्यासाठी महाडिबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

बैल चोरी

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबोली इथ गुरांची वाहतूक करणाऱ्या मालवाहू ट्रकसह एका मोटारीवर आंबोली पोलीसांनी काल धडक कारवाई केली. ट्रकमध्ये चोरटी वाहतूक करुन नेले जाणारे ९ बैल आढळून आले. यातला एक बैल जखमी अवस्थेत होता. पोलिसांनी वाहनं आणि बैल जप्त केले असून कर्नाटकातील चारजणांना ताब्यात घेतल आहे.

मोहीम

पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रात काम करणाऱ्या 'मॅंग्रुव्हज सोल्जर' या संस्थेच्या वतीनं काल नेरूळ इथल्या सारसोळी जेट्टी परिसरात प्लास्टिक आणि पाण्याच्या प्रवाहात वाहून आलेला कचरा गोळा करून खाडी किनारा स्वच्छ करण्यात आला. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार आणि परिमंडळ-एकचे उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्या नियंत्रणाखाली लोकसहभागातून ही दोनशेवी स्वच्छता ही मोहीम राबविण्यात आली. दर आठवड्यात सुटीच्या दिवशी नवी मुंबईतल्या विविध किनारी भागात मॅंग्रुव्हज सोल्जर या संस्थेच्या वतीनं विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येते अशी माहिती संस्थेचे धर्मेश बराई यांनी दिली.

वृक्षारोपण

जागतिक पर्यावरण दिन आणि फादर्स डे निमित्तानं निसर्गाविषयी आपुलकीची भावना व्यक्त करण्यासाठी नवी मुंबईत बेलापूर इथल्या पारसिक हिल परिसरात बेलापूर विभाग कार्यालय आणि नेरूळच्या एस. के. कॉलेजच्या एनएसएस विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण उपक्रम राबवला. माझी वसुंधरा अभियानाची सामुहिक शपथही यावेळी उपस्थितांनी घेतली. पारसिक हिल परिसरात पडलेला प्लास्टिक, कागद आदी कचरा गोळा करून स्वच्छता करण्यात आली.

नद्या

नदी प्रवाही राहणं तसंच नदीकडं जिवंत परिसंस्था आणि स्रोत म्हणून पाहणं अत्यंत आवश्यक आहे. आपल्या घरातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यामुळं नदीचा 60 टक्के भाग प्रदूषित होत आहे, तो टाळण्यासाठी नदीचा नैसर्गिक घाट जपणं, नदीची वहन क्षमता वाढविणं गरजेचं आहे, असं प्रतिपादन जीवित नदीच्या संस्थापक शैलजा देशपांडे यांनी काल पुण्यात केलं. गंगोत्री होम्स आणि भारतीय हरित इमारत परिषदेच्या पुणे शाखेद्वारे 'आपली नदी आपली जबाबदारी' या विषयावर पुण्यात आयोजित कार्यक्रमात शैलजा देशपांडे बोलत होत्या.

शुभेच्छा

राज्यपाल रमेश बैस यांनी आजच्या बकरी ईद निमित्त मुस्लिम बंधू-भगिनींना शुभेच्छा दिल्या आहेत. ईद अल-अधा हा सण त्याग, करुणा तसंच गोरगरीब आणि उपेक्षितांच्या कल्याणासाठी परोपकाराचा संदेश देतो. या उदात्त मूल्यांच्या जपणुकीसाठी प्रयत्न करुन एक उत्तम, सर्वसमावेशक समाज निर्माण करण्याचा संकल्प करुया, असं राज्यपाल बैस यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

हवामान

पुण्यासह राज्याच्या विविध भागातून नाहीसा झालेला मोसमी पाऊस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता असून प्रामुख्यानं घाटमाथा आणि धरणांच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. जूनच्या पहिल्या ८ दिवसात चांगल्या पद्धतीनं बरसलेला मोसमी पाऊस गेल्या आठवडाभरापासून नाहीसा झाला आहे. त्यामुळं शेतीची कामं देखील खोळंबलेली आहेत. राज्यातील अनेक मोठ्या धरणांनी तळ गाठला असून कोयना धरणातील वीज निर्मिती देखील बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार मोसमी पावसाच्या पुढील वाटचालीसाठी राज्यात अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ लागली असून २२ तारखेनंतर पावसाचं प्रमाण वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपल , नमस्कार